# येणारा काळ ई-बुक्सचा!

**अनुजा चवाथे,** मुंबई



मटा विशेष

बदलत्या मागणीनुसार आता प्रकाशकही बदलत असल्याने मराठी ई-बुक्स व्यवहारात आता क्रांतीचे वारे लवकरच वाहतील. ज्या प्रकाशकांना अनुवादित, इंग्रजी किंवा इतर पुस्तकांच्या माध्यमातून नफा कमावणे शक्य झाले आहे त्यांनी स्वत:ची यंत्रणा उभारली आहे. सध्या तरी आधीपासून लोकप्रिय असलेली पुस्तकेच ई-बुक्स प्रकारात उपलब्ध आहेत. मॅजेस्टिक प्रकाशनाचे अशोक कोठावळे सांगतात की एकदा पीडीएफ तयार झाले की ई-बुक करणे कठीण नाही. आता ई-बुकसाठी रॉयल्टीही निश्चित होऊ लागली आहे. त्यामुळे लेखकांच्या मनात असलेला गोंधळ संपेल, अशी आशा ते व्यक्त करतात. त्याशिवाय ई-बुक्सची वाचनीयता वाढवण्यासाठी त्यात ऑडिओ व व्हिडिओ क्लिप समाविष्ट करता येऊ शकेल, असंही ते सांगतात. मोहन जोशी यांच्या 'नटखट' या आत्मचरित्रासंदर्भात असे प्रयोग सुरू असल्याचंही त्यांनी 'मटा'शी बोलताना सांगितलं.

मेहता पब्लिशिंग हाऊसने आतापर्यंत सुमारे ६०० ई-बुक्स मार्केटमध्ये आणली आहेत. त्यांनी स्वत:चं स्वतंत्र सॉफ्टवेअर त्यासाठी विकसित केलं. पुस्तक निर्मितीचा खर्च निघाल्यानंतर ई-बुक्सच्या किंमती छापील पुस्तकांपेक्षा कमी होतील, अशी आशा मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता व्यक्त करतात. त्यामुळे अधिकाधिक वाचक ई-बुक्सकडे वळतील. मात्र ई-बुक्समध्ये रक्कम गुंतवायची की नाही, याबद्दलच मराठी प्रकाशक साशंक आहेत. त्याशिवाय मराठी प्रकाशकांमध्ये एकी नसल्याने ई-बुक्स निर्मितीला फटका बसला, याची जाणीवही ते करून देतात.

अनेक प्रकाशकांची ई-बुक्ससाठी स्वत:ची व्यवस्था नसल्याने बुकगंगाच्या माध्यमातून त्यांनी वाचकांपर्यंत पुस्तकं पोहोचवली. गेल्या वर्षी ई-बुक्स विक्रीचं प्रमाण अवघा १ टक्का होतं. मात्र आता हे प्रमाण ४ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचं बुकगंगाचे संस्थापक मंदार जोगळेकर सांगतात. काही लोकप्रिय पुस्तकांव्यतिरिक्त आऊट ऑफ प्रिंट, आध्यात्मिक, करिअर संदर्भातली, उद्योग व्यवस्थापन या पुस्तकांची मागणी सर्वाधिक असल्याचं ते सांगतात. भारताबाहेरून, आयटी क्षेत्रातून ई-बुक्ससाठी वाढती मागणी आहे. मोबाइलच्या क्षेत्रात जशी क्रांती घडली तशीच मराठी ई-बुक्स क्षेत्रातही घडेल, अशी आशा त्यांना आहे. प्रकाशकही ही बाब मान्य करतात. येणारा काळ ई-बुक्सचा असेल, असं ते सांगतात.

मराठी ई-बुक्सचा सर्वात जास्त फायदा ग्रामीण भागातील तरुण वर्गाला होणार आहे. जिथे पुस्तकं पोहोचत नाहीत तिथे आज फोन व इंटरनेट पोहोचलं आहे. त्यामुळे केवळ एका क्लिकवर ही पुस्तकं उपलब्ध होतील. ई-बुक्स निर्मितीचं तंत्र सवयीचं झालं व स्वस्तात ई-बुक्स उपलब्ध झाली तर ही उलाढाल येत्या काही वर्षांमध्ये प्रिंट पुस्तकांपेक्षाही अधिक होईल, असा विश्वास खुद्द प्रकाशकच व्यक्त करत आहेत. त्यामुळे आता वाचकही अधिक देखण्या मराठी ई-बुक्सच्या प्रतीक्षेत आहेत. **(उत्तरार्ध)**